लोकमत

# मुक्त विद्यापीठ वित्त व लेखाधिकारीपदी संजय कुबल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील उपकुलसचिव संजय कुबल यांची नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारीपदी निवड झाली आहे. या निवडीचा ई-मेल त्यांना मुक्त विद्यापीठाकडून मंगळवारी मिळाला.

उपकुलसचिव कुबल हे सध्या अभ्यासमंडळ आणि पात्रता विभागाचे उपकुलसचिव आहेत. यापूर्वी त्यांनी लेखा विभाग, पीजीबीयुटीआर, विद्यापीठ महाविद्यालय विकास कक्ष आणि सांखिकी विभागात काम केले आहे. त्यांचे मूळ गाव खारेपाटण आहे. त्यांनी नौदलामध्ये १५ वर्षे सेवा बजावली आहे. मुंबई विद्यापीठात दोन वर्षे उपकुल सचिवपदी काम केले आहे.

लोकमत

# अर्थशास्त्राच्या 'त्या' विद्यार्थ्यांची परीक्षा होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तांत्रिक अडचणीमुळे शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातील प्रथम वर्षाच्या पाच विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही. त्यांना परीक्षा देण्याची संधी मिळणार आहे.

प्रथम वर्षाच्या परीक्षा मंगळवारपासून सुरू झाल्या आहेत. त्यातील अर्थशास्त्र विभागातील पाच विद्यार्थ्यांबाबत तांत्रिक अडचण निर्माण झाली. त्यामुळे त्यांची परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे नोंद झाली नाही. त्यामुळे त्यांना परीक्षा देता आली नाही. त्यांची तांत्रिक अडचण दूर करण्यात येईल. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. त्यांची परीक्षा घेतली जाणार असल्याची माहिती या विभागाचे प्रमुख डॉ. डी. सी. तळुले यांनी दिली.

लोकमत

# पीएच.डी. प्रबंध सादर करता येणार ३१ डिसेंबरपर्यंत

## कोरोनामुळे शिवाजी विद्यापीठाचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोरोनाचा प्रादुर्भाव वाढताना क्षेत्र (फिल्ड) संशोधन करणे अडचणी ठरत आहे. त्यामुळे एम..फिल., पी.एचडी.चे प्रबंध सादर करण्यास शिवाजी विद्यापीठाने दि. ३१ डिसेंबरपर्यंतची मुदतवाढ दिली आहे.

कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेंतर्गत विविध विषयांवर पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांकडून एम. फिल., पीएच.डी.चे संशोधन सुरू आहे. सलग दुसऱ्यावर्षी कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने त्यांना फिल्डवर जाऊन माहिती घेणे, संशोधन करणे शक्य होत नसल्याचे वास्तव आहे. त्यामुळे प्रबंध सादर करण्यासाठी विद्यापीठाने मुदतवाढ द्यावी, अशी मागणी सुरू होती. काही विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना निवेदन दिले होते. विद्यार्थ्यांच्या मागणीचा विचार करून आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक निकष लक्षात घेऊन विद्यापीठाने प्रबंध सादर करण्यास ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्याबाबतचे परिपत्रक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सोमवारी काढले आहे. या परिपत्रकाद्वारे संशोधक विद्यार्थी, मार्गदर्शक, शिक्षकांना या मुदतवाढीची माहिती दिली आहे.



पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने बुद्ध पौर्णिमेनिमित्त आज विशेष व्याख्यान

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' या यू ट्यूब वाहिनीवर बुधवारी (दि. २५) सकाळी १०.३० वाजता बुद्ध पौर्णिमेनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धम्मक्रांती' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानास ऑनलाईन लिंकद्वारे उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

पुढारी

# मुक्त विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारीपदी संजय कुबल



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील वरिष्ठ उपकुलसचिव संजय कुबल यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वित्त व लेखाधिकारीपदी निवड झाली आहे. मंगळवारी त्यांना नियुक्तीच्या आदेशाचा ई-मेल प्राप्त झाला आहे. दीड महिन्यापूर्वी मुलाखती झाल्या होत्या. मुक्त विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत त्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठात २००३ मध्ये सहायक कुलसचिव म्हणून कुबल सेवेत रुजू झाले. त्यानंतर २०११ रोजी त्यांना उपकुलसचिव पदावर बढती मिळाली. त्यानंतर दोन वर्षे मुंबई विद्यापीठात उपकुलसचिव व त्यानंतर १० वर्षांपासून ते उपकुलसचिव म्हणून शिवाजी विद्यापीठात कार्यरत आहेत. गेल्या पाच वर्षात ८० कोटी रुपयांच्या निधीचा वापर केला आहे. रुसा, स्ट्राईड, नॅक विभागात त्यांनी महत्त्वाची जबाबदारी सांभाळली आहे.

पुढारी

# कोरोना परिस्थितीवर मात करण्यासाठी उपाय शोधा

## कुलगुरू शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

साथीच्या रोगाचा सर्व देशभर होत असलेल्या दुष्परिणामांचा अभ्यास करण्यासाठी बरेच दृष्टिकोन आहेत. संशोधक व विचारवंतांनी एकत्र येऊन या परिस्थितीवर मात करण्यासाठी उपाय शोधले पाहिजेत, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

केईएस श्रॉफ कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, कांदिवली मुंबई, शिवाजी विद्यापीठ बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. भारत सरकारच्या महिला उच्चस्तरीय समितीचे माजी अध्यक्ष डॉ. पाम राजपूत यांनी स्थलांतरित महिला, मुली, कामगार महिलांवर कोरोनाच्या झालेल्या परिणामावर भाष्य केले.

डॉ. विभूती पटेल, डॉ. संगीता देसाई, डॉ. मारीम, डॉ. चित्रा सिन्हा यांनी मनोगत व्यक्त केले. ऑस्ट्रेलियाचे डॉ. एलिझाबेथ ब्रोडरिक यांच्या भाषणाने परिषदेचा समारोप झाला. ९०० जणांनी परिषदेत सहभाग नोंदविला. पाच सत्रांत ९३ पेपरचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रा. पी. एस. पाटील, प्राचार्य, डॉ. लिली भुसन, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. प्रतिभा देसाई, वैशाली ओझा उपस्थित होत्या.

तरूण भारत

# एमफिल, पीएचडीच्या प्रबंधासाठी मुदतवाढ

कोल्हापूर : कोरोनाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी देश लॉकडाऊन केल्याने गेल्या वर्षभरापासून शिक्षणसंस्था, विद्यापीठ बंद आहेत. परिणामी एम. फिल., पीएच. डी.च्या विद्यार्थ्यांना शोधप्रबंध तयार करण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे विद्यार्थी हित लक्षात घेवून एम. फिल., पीएच. डी.चा शोधप्रबंध सादर करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत मुदतवाढ द्या असे परिपत्रक विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठाला पाठवले आहे. या परिपत्रकानुसार शिवाजी विद्यापीठातील एम. फिल., पीएच. डी.च्या विद्यार्थ्यांना मुदतवाढ दिली आहे, असे पत्रक विद्यापीठ प्रशासनाने संकेतस्थळावर प्रसिध्द केले आहे. ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत मुदतवाढ दिल्याने या संशोधक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील परिपत्रकाची दखल घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांना केले आहे.